नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक २०/०८/२०२२ (शनिवार)**

**(दुपार)**

---

## विनयभंग

**पो.स्टे. सावनेर:–** दिनांक १९/०८/२०२२ चे १६.०० वा. दरम्यान आरोपी नामे– प्रमोद भुजंग दलाल, वय २७ वर्ष रा. मानेगाव याने फिर्यादी/पीडित वय २४ वर्ष हिला 'माझ्याशी लग्न का करीत नाही' या कारणावरून फिर्यादीचे घरात प्रवेश करून तिला पलंगावरून खाली पाडले व घराचे बाहेर आणुन रबरी पाईप व लाकडी काडीने मारहाण करून जिव घेण्याची धमकी दिली. तसेच फिर्यादी यांना सोडविण्यासाठी गेलेली साक्षीदार यांची आई व शेजारी राहनारी यांनाही आरोपीने मारहाण केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ४५२, ३५४, ३५४ (एम), ३२४, ५०६ भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि नागवे मो.नं ९८२३४०३५६५ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पो.स्टे. मौदा :–** अंतर्गत कुंभारी शिवार येथे दिनांक १८/०८/२२ चे १३.०० वा ते १४.०० वा. सुमारास **जयनारायन ईस्तारू पटले (मृतक), वय ३६ वर्ष, रा. वृंदावन लॉन मौदा** याने कुंभारी शिवारातील शेतात फसलेला ट्रॅक्टर हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन ट्रॅक्टर उलटला. त्यामुळे तो ट्रॅक्टरच्याखाली चिखलात दबुन मरण पावला. आरोपी हा स्वाताच्या मरणास स्वहताह कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– दिनेश मनोहरराव ढोबळे, वय ५६ वर्ष, रा. शिवाजी नगर, मौदा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम ३०४ अ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री बिरोले ९५५२५१३५९५ हे करीत आहे.

## जबर दुखापत

**पो.स्टे. सावनेर :–** अंतर्गत ०४ कि. मी. अंतरावरील डब्लु सी. एल वाघोडा सावनेर दुर्गा मंदीर समोर येथे दिनांक १८/०८/२०२२ चे ०९.३० वा. ते ०९.४५ वा. सुमारास फिर्यादी नामे– सौ. रविता जितेन्द्र वरखडे वय २६ वर्ष, रा. क्वार्टर नं. ७६/२, शक्तीनगर डब्लु सी. एल सावनेर हिचे पती जखमी नामे– जितेन्द्र अशोक वरखडे, वय ३८ वर्ष हे बसले असता आरोपी नामे– १) अमर गुप्ता, २) आशु छानेकर दोन्ही रा. शक्तीनगर डब्लु सी. एल सावनेर यांनी तिचे पतीला 'आमची खदान युनियनची तिकीट का कापली नाही' या कारणावरुन संगनमत करुन आरोपीतांनी हातभुक्कीने व लाकडी काठीने मारहाण करून जखमी केले. तसेच आरोपीतांनी फिर्यादीचे पतीला शिवीगाळ करुन मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३२६, ५०४, ५०६, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास ग्रेड पोलिस उपनिरीक्षक श्री अनिल तिवारी मो. क्र. ९६८९८९१४८६ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**